मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » बुधवार, दि. 8 जानेवारी 2025 | पान- 1

# "मावळ माझा"चे संपादक विशाल विकारी यांना राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भूषण पुरस्कार प्रदान

## निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहामध्ये हा पुरस्कार वितरणाचा सोहळा पार पडला

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोणावळा येथील मावळ माझा न्युज चे संस्थापक संपादक व लोणावळा शहर पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विशाल यशवंत विकारी यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, पिंपरी चिंचवड पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मराठी पत्रकार दिनाच्या निमित्त 6 जानेवारी रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहामध्ये हा पुरस्कार वितरणाचा सोहळा पार पडला. पत्रकारिता क्षेत्रातील अत्यंत मानाचा समजला जाणारा हा पुरस्कार आहे.



ABP माझा च्या संपादिका सरिता कौशिक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे, अभिनेते किरण माने, दैनिक लोकमतचे सोलापूर संपादक सचिन जवळकोटे, पद्मभूषण डॉक्टर गिरीश प्रभुणे, माजी आमदार विलास लांडे, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकडे, कामगार नेते यशवंत भोसले, इरफान भाई सय्यद, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष अतुल क्षीरसागर, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्षा मनीषा थोरात-पिसाळ, सचिन चपळगावकर यांच्यासह अनेक मान्यवर या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रामुख्याने उपस्थित होते.

विशाल विकारी यांनी 2003 साली साप्ताहिक इंद्रायणी वार्ताच्या माध्यमातून पत्रकारितेला सुरुवात केली. 2005 सालापासून दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रातून त्यांच्या दैनिक वृत्तपत्र पत्रकारितेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. पुढील काळामध्ये दैनिक लोकमतचे सलग चौदा वर्ष वार्ताहर म्हणून त्यांनी काम केले. सोबतच दैनिक तरुण भारत, दैनिक सकाळ, दैनिक प्रभात, दैनिक भास्कर, यामध्ये देखील त्यांनी काही काळ कामे केली आहेत. 2008 साली सुरू झालेल्या पहिल्या डिजिटल पोर्टल एमपीएससी न्यूज चे कामकाज त्यांनी सांभाळले. अनेक टिव्ही चॅनल मध्ये त्यांनी बातम्या दिल्या आहेत. 2019 साली कोरोना काळामध्ये सर्व जग थांबले, वृत्तपत्र बंद झाली असताना आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडी ह्या नागरिकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मावळ माझा न्युज या लोणावळा शहरातील पहिल्या डिजिटल न्युज पोर्टलची स्थापना केली. आज मावळ तालुक्यातील अग्रगण्य डिजिटल न्युज पोर्टल म्हणून मावळ माझा न्युजची ओळख आहे.

मागील 21 वर्ष लोणावळा शहर व मावळ तालुक्यामध्ये पत्रकारिता करत असताना त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, गुन्हेगारी, कला व क्रीडा या विविध विषयांवर परखडपणे लिखाण केले. अनेक निर्णय घेण्यास प्रशासनाला व राजकारणांना भाग पाडले. मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर सातत्याने होत असलेले अपघात रोखण्यासाठी सध्या ज्या उपाययोजना सुरू आहेत त्या उपाययोजना होण्यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण लिखाण केले. लोणावळा शहर व मावळ तालुका हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने त्या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टिकोनातून नवनवीन प्रकल्प यावेत याकरिता पाठपुरावा केला. स्थानिक नागरिकांचे प्रश्न सातत्याने मांडत प्रशासनाकडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठवला. मावळ तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आहे. या आदिवासी समाजाला जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी सातत्याने लिखाण करत त्यांना जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मावळातील जमीन व्यवहार प्रकरणावर मालिका लिखाण केले. त्याची दखल घेत दुय्यम निबंध कार्यालयामध्ये दस्त नोंदणी करताना आधार लिंक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### विशाल विकारी यांचे लिखाण समाजहिताचे..!

**» लोणावळा ते तुळापूर वाहणाऱ्या इंद्रायणी नदीची दुरावस्था ही मालिका प्रसारित करण्यामध्ये महत्त्वाचा पुढाकार घेत इंद्रायणीची झालेली अवस्था शासनासमोर मांडत इंद्रायणी नदी सुशोभीकरणाच्या कामाचा डीपीआर तयार होण्यासाठी सातत्यपूर्ण लिखाण व पाठपुरावा केला. कुलस्वामिनी आई एकवीरा देवीच्या मंदिर परिसराचा विकास व्हावा यासाठी वारंवार वार्तापत्र प्रसिद्ध केली. अशा विविध प्रकारच्या अभ्यासपूर्ण व सातत्यपूर्ण लिखाणामुळे व त्यामधून झालेल्या सकारात्मक बदलाची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांच्यावतीने विशाल विकारी यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.**

# बांगलादेशी, रोहिंग्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिसांचा आता 'सर्जिकल स्ट्राईक'

## आमदार लांडगे यांची लक्षवेधी अन् पोलिसांकडून 'ॲक्शन' : देशाच्या सुरक्षेबाबत सरकारचे 'नो कॉम्प्रमाईज'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस

# 'HMPV'चा धोका वाढताच पालिका ॲक्शन मोडवर

## नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणाची व्यवस्था अन् रुग्ण सर्वेक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) या साथरोगाचा धोका वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने खबरदारीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणासाठी ५० रुग्णशय्या आणि ५ अतिदक्षता रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर शहरातील सर्दी, खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.




महापालिकेच्या आरोग्य विभागाने राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एचएमपीव्हीचा संसर्गाबाबत खबरदारीची पावले उचलली आहेत. करोना साथीनंतर महापालिकेने भविष्यात संसर्गजन्य आजाराची साथ आल्यास नायडू रुग्णालयात रुग्णशय्यांची व्यवस्था केली आहे. त्यानुसार, त्यात नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणासाठी ५० रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. भविष्यात एचएमपीव्हीची साथ वाढल्यास त्यासाठी नायडू रुग्णालयांत विलगीकरणासाठी ३५० रुग्णशय्यांची व्यवस्था आहे. याचबरोबर खासगी रुग्णालयांची मदत घेऊन विलगीकरणासाठी ३ हजार ५०० रुग्णशय्यांची व्यवस्था करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

सर्दी, खोकल्याचे रुग्ण महापालिकेच्या दवाखान्यात आल्यास त्यांची स्वतंत्र नोंद ठेवण्याचे निर्देश महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिले आहेत. या रुग्णांची संख्या आणि त्यांची लक्षणे यावर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. रुग्णांची संख्या वाढत आहे का आणि त्यांच्यात इतर कोणती लक्षणे दिसून येत आहेत का, याची तपासणी सातत्याने केली जाणार आहे. यामुळे रुग्णांची संख्या वाढल्यास आणि इतर लक्षणे दिसून आल्यास आरोग्य विभाग तातडीने पावले उचलू शकणार आहे.

### अतिदक्षता म्हणून 'या' गोष्टी कराव्या :

- » खोकताना किंवा शिंकताना तोंडावर व नाकावर रुमाल ठेवावा. सॅनिटायझरनं हात वारंवार धुवावेत.
- » ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
- » भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्न खा.
- » संक्रमण कमी करण्यासाठी व्हेंटीलेशन होईल, याची दक्षता घ्या.

### 'या' गोष्टी टाळा :

खोकलेल्या किंवा शिंकलेल्या हातांनी हस्तांदोलन करणं टाळावं.

टिश्यू पेपरचा वापर केल्यानंतर तो कचरा पेटीत टाकावा.

वारंवार एकाच टिश्यू पेपरचा वापर करणं टाळावं.

आजारी लोकांपासून लांब राहावं.

व्हायरल इन्फेक्शन झालेलं असल्यास शक्यतो रुग्णाच्या जवळ जाऊ नये.

डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये.

> "एचएमपीव्हीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्दी-खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. याचबरोबर खासगी डॉक्टरांची बैठक घेऊन त्यांनाही सर्दी, खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना केल्या जाणार आहेत.
> **- डॉ. नीना बोराडे, आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका.**

# निगडीपर्यंत मेट्रोमुळे वाढणार कनेक्टिव्हिटी!

## चिंचवड, आकुर्डी, निगडी स्थानके : तळवडे, किवळे, मामुर्डी, रावेतच्या प्रवाशांची सोय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी (पीसीएमसी) मार्गिकेचा निगडीतील भक्तिशक्ती चौकापर्यंत विस्तार केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे मुंबई-पुणे महामार्गाच्या परिसरातील चिंचवड, आकुर्डी, निगडी या गावांसह चिखली, तळवडे, संभाजीनगर, शाहूनगर, यमुनानगर, प्राधिकरण, रावेत, किवळे, मामुर्डी या गावांचीही कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पुणे मेट्रोच्या दोन मार्गांवर प्रवासी सेवा सुरू झाली आहे. स्वारगेट ते पिंपरी (पिंपरी-चिंचवड महापालिका भवन - पीसीएमसी) आणि पुण्यातील वनाज ते रामवाडी असे हे दोन मार्ग आहेत. या दोन्ही मार्गांवर प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे पिंपरी, चिंचवड, भोसरी, पूर्णानगर, मोरवाडी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, पिंपळे सौदागर, सांगवी, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी, काळेवाडी, जाधववाडी, मोशी आदी भागातील नागरिकांना पुण्यात जाणे सोयीचे झाले आहे. या भागांना जोडण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) मेट्रो स्थानकांशी जोडणारी बससेवा सुरू केली आहे.

काही जण स्वतःच्या दुचाकीने किंवा रिक्षाने मेट्रो स्थानकांपर्यंत येऊन पुढील प्रवास मेट्रोने करत आहेत. त्यामुळे शहरातील पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी स्थानकांवर प्रवाशांची संख्या वाढू लागली आहे. कारण, पुणे न्यायालय स्थानकावर उतरून कोथरूड, कर्वेनगर, वनाज आणि पुणे स्टेशन, येरवडा, रामवाडी भागात जाणे सहज सोपे झाले आहे.

आता या स्वारगेट-पिंपरी मार्गिकेचा विस्तार निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. पुढील दोन वर्षात प्रवासी सेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शहराच्या उर्वरित भागातील विशेषतः मुंबई-पुणे महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या गावांची कनेक्टिव्हिटी मेट्रोने वाढणार आहे. शिवाय, हे दोन्ही बाजूंची गावेही पीएमपीने मेट्रो स्थानकाशी जोडली जाणार आहेत.

> "निगडीपर्यंत मेट्रो आल्यामुळे तळवडे, रुपीनगर, त्रिवेणीनगर भागातून पुण्यात जाणाऱ्यांची सोय होईल. शिवाय, पीएमपीच्या तुलनेने प्रवास जलद होईल. नोकरदार व विद्यार्थ्यांसह अन्य प्रवाशांनाही मेट्रो सोयीची होईल. वाहतूक कोंडीत न अडकता इच्छित ठिकाणी वेळेत पोहोचता येईल.
> **- पूनम डिंगोरे, नोकरदार, त्रिवेणीनगर, निगडी.**

### पिंपरी स्थानकाशी किवळे 'कनेक्ट'

शहराच्या उत्तरेकडील शेवटचे टोक म्हणजे किवळे व मामुर्डी ही गावे आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका भवनापासून (पिंपरी मेट्रो स्थानक) साधारण १२ ते १५ किलोमीटरवर ही गावे आहेत. ती आता किवळेतील मुकाई चौकापासून पिंपरी मेट्रो स्थानकाशी पीएमपीने जोडली गेली आहेत. अर्थात पिंपरी मेट्रो स्थानक ते मुकाई चौक किवळे अशी बससेवा पीएमपीने सुरू केली आहे.

# पर्यावरणासाठी सोसायटीधारक उतरणार रस्त्यावर

## ताथवडे, पुनावळेतील येथील हवा-ध्वनिप्रदूषण, विविध प्रश्नांसाठी निघणार मूकमोर्चा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील ढासळलेले पर्यावरण असो, वेगाने होणारी वृक्षतोड, हवा-ध्वनिप्रदूषणावर सातत्याने त्यावर प्रशासनाविरोधात आवाज उठविला जातो. मात्र याच परिस्थितीवर आता आपला निषेध नोंदविण्याचा प्रयत्न ताथवडे, पुनावळेकर करणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील ढासळलेले पर्यावरण असो, वेगाने होणारी वृक्षतोड, हवा-ध्वनिप्रदूषणावर सातत्याने त्यावर प्रशासनाविरोधात आवाज उठविला जातो. मात्र याच परिस्थितीवर आता आपला निषेध नोंदविण्याचा प्रयत्न ताथवडे, पुनावळेकर करणार आहेत. हवाप्रदूषण या संकल्पनेवर शनिवारी, ८ मार्चला मूक मोर्चा काढण्यात येणार आहे.



ताथवडे, पुनावळे, वाकड आणि मारुंजी परिसरातील हवेचे प्रदूषण वाढले आहे. अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यासह अन्य विविध प्रश्नांकडे पिंपरी-चिंचवड महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे लक्ष वेधण्यासाठी या परिसरातील ५० हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांमधील रहिवासी, तसेच आयटियन्स शनिवारी मूक मोर्चा रस्त्यावर उतरणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरी विकासाचा ध्यास घेतलेल्या महापालिका प्रशासनाकडून मागील वर्षभरात वारंवार बेसुमार वृक्षतोड करण्यात येत आहे. वृक्ष लागवडीचा दिखावा करणा-या महापालिका प्रशासनाकडून प्रत्यक्षात त्या वृक्षांचे संवर्धन केले जात नसल्याची बाब वारंवार समोर आली आहे. वृक्षतोड तसेच शहरातील वाढत्या ट्रॅफिकमुळे प्रदूषित हवेचा फटका सर्वच वयोगटातील नागरिकांना बसत आहे.

ताथवडे-वाकड येथील ताकभाते कॉर्नरजवळील कोहिनूर कोर्ट यार्ड सोसायटीपासून सकाळी आठ वाजता मोर्चाला सुरुवात होईल. कोहिनूर कोर्ट यार्ड सोसायटी, एलिट होम्स सोसायटी, झेनिथ सोसायटी, ईशा फूटप्रिंट, शनी मंदिर, इंदिरा स्कूल रस्ता, ताकभाते कॉर्नरमार्गे पुढे वाकडकर कॉर्नर येथे त्याची सांगता होणार असल्याचे प्रशांत काटे यांनी सांगितले.

शनी मंदिर, इंदिरा स्कूल रस्ता भागातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत आहे. परिसरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात सिमेंटमिश्रित धूळ साचल्यामुळे हवेचे प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. श्वसनाचे विकार, डोळ्यांचे त्रास आणि त्वचारोग वाढले आहेत. रस्त्यांची स्वच्छता न राखल्यामुळे परिसर अस्वच्छ झाला आहे.

या परिसरात २० मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सात हजार नागरिक राहतात. प्रदूषणामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिसरात चार शाळा असून, विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

### नागरिकांच्या मागण्या

- » दररोज रस्त्यांची दोन वेळा नियमितपणे यंत्राद्वारे पाण्याच्या साहाय्याने साफसफाई करावी
- » धुळीच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'वॉटर स्प्रे' प्रणाली बसवावी
- » सार्वजनिक स्वच्छतेसाठी उपाययोजना कराव्यात
- » रस्त्यांवरील खडी आणि सिमेंट गळती रोखण्यासाठी वाहतूकदारांवर जबाबदारी निश्चित करावी
- » श्वसनाच्या समस्यांपासून संरक्षण मिळावे यासाठी स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवावी
- » शनी मंदिर ते मारुंजी रस्त्याच्या दुतर्फा झाडांची योग्य निगा राखली जावी

# चिंचवड-थेरगाव बटरफ्लाय ब्रिज गैरव्यवहाराच्या सखोल चौकशीची आमदार शंकर जगताप यांची मागणी

## सात वर्ष रखडलेल्या पुलाच्या कामाकडे वेधले सरकारचे लक्ष , संबंधित ठेकेदार, सल्लागार आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड-थेरगाव दरम्यानच्या बटरफ्लाय ब्रिजच्या कामातील कथित गैरव्यवहारावर आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. सदर पुलाच्या कामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित ठेकेदार, सल्लागार आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.





**२०१७ मध्ये २८.७१ कोटींच्या निविदेने कामाला सुरुवात..**

थेरगाव येथील प्रसून धाम हाउसिंग सोसायटीजवळून चिंचवड-थेरगाव जोडणाऱ्या बटरफ्लाय ब्रिजच्या कामासाठी २०१७ साली धनेश्वर कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला २८ कोटी ७१ लाख रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली. विशेष म्हणजे ही निविदा मूळ अंदाजपत्रकाच्या १४% अधिक दराने मंजूर करण्यात आली होती.

**अतिरिक्त ११ कोटींचा भुर्दंड; तरीही एक बाजू अद्याप अपूर्ण**

सुरुवातीच्या अंदाजपत्रकानुसार २५ कोटींच्या निविदा मंजूर झाल्यानंतरही काम वेळेत पूर्ण झाले नाही. परिणामी, महानगरपालिकेने अतिरिक्त ११ कोटी ३ लाख रुपये मंजूर करून काम पूर्ण करण्याचे आदेश दिले. यानंतरही पुलाच्या एका बाजूचे काम अद्याप अपूर्ण आहे.

**सामाजिक कार्यकर्त्यांकडून लेखी तक्रार; दोषींवर कारवाईची मागणी**

या प्रकरणात ठेकेदार, कन्सल्टंट आणि संबंधित अधिकारी यांच्यात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला जात आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्यांनी जानेवारी २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणावर सरकार काय भूमिका घेते आणि दोषींवर काय कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### सखोल चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची मागणी

- » एका पुलासाठी तब्बल ३९.७४ कोटी रुपये खर्च करूनही सात वर्षांत काम पूर्ण का झाले नाही?
- » ठेकेदार आणि कन्सल्टंटला काळ्या यादीत टाकून दंडात्मक कारवाई केली जाणार का?
- » या प्रकरणाची चौकशी टाटा कन्सल्टन्सी किंवा सीओईपीच्या तज्ज्ञांमार्फत केली जाणार का?

### वेळेवर काम न झाल्याने दोनदा मुदतवाढ

- » मूळ निविदेनुसार ठेकेदाराला १८ महिन्यांत काम पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र, वेळेत काम न झाल्याने ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तरीही काम अपूर्ण राहिल्याने सप्टेंबर २०२४ पर्यंतची दुसरी मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, काम पूर्ण न झाल्याने २६ जानेवारी २०२५ पर्यंत पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे.

# पेट्रोल पंपाअभावी नागरिक त्रस्त, महापालिकेकडून मदतीची अपेक्षा

## पेट्रोल भरण्यासाठी सात ते आठ किलोमीटरचा प्रवास करुन जावे लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक करत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

बालेवाडी परिसरात पेट्रोल पंप नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पेट्रोल भरण्यासाठी सात ते आठ किलोमीटरचा प्रवास करून जावे लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक करत आहेत.

स्मार्ट सिटी योजनेचा भाग असूनही बालेवाडी परिसरात पेट्रोल पंप नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पेट्रोल भरण्यासाठी सात ते आठ किलोमीटरचा प्रवास करून जावे लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक करत आहेत. त्यामुळे वेळ तसेच इंधनाची नासाडी होत आहे.

बालेवाडी हा स्मार्ट सिटी योजनेचा भाग असून या भागाचा झपाट्याने विकास होत आहे. आयटी पार्क जवळ असल्यामुळे परिसरातील लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे स्थानिक वाहनधारकांच्या सोयीसाठी परिसरातच पेट्रोल पंप असणे आवश्यक आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी महापालिकेकडे पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच विधानसभा निवडणुकीआधी स्थानिक आमदार चंद्रकांत पाटील यांनाही या संदर्भात निवेदन दिले होते. मात्र तरीही परिसरात पेट्रोल पंप आणण्यासंदर्भात कोणतीही पावले उचलली गेली नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

बालेवाडी परिसरात एक 'सीएनजी स्टेशन' आहे. मात्र पेट्रोल किंवा डिझेल भरण्यासाठी नागरिकांनी काही किलोमीटरचा प्रवास करून बाणेर रस्ता किंवा पिंपरी-चिंचवडमधील वाकड किंवा विशालनगर येथे जावे लागते. परिसरात पेट्रोल पंप सुरू व्हावा अशी मागणी अनेक वर्षांपासून नागरिकांकडून केली जात आहे. तसेच भारत पेट्रोलियम कंपनीलाही या भागात आपले आउटलेट सुरू करण्याची इच्छा असल्याची माहिती नागरिकांनी दिली.



### महापालिकेने जागा द्यावी

» खासगी भूखंड उपलब्ध होत नसल्यामुळे परिसरातील महापालिकेच्या मालकीच्या जागांपैकी एखादी 'अमेनिटी स्पेस' पेट्रोल पंपासाठी उपलब्ध करून द्यावी अशी विनंती बालेवाडी वेल्फेअर फेडरेशनने महापालिका तसेच मंत्री चंद्रकांत पाटील यांना विधानसभा निवडणुकीआधी केली होती.

### या कारणामुळे रखडले काम

» जमिनीचे वाढते भाव हे बालेवाडी परिसरात पेट्रोल पंप नसण्याचे महत्त्वाचे कारण आहे. भूखंडांचे दर प्रचंड वाढल्याने जमीनमालक आपली जमीन पेट्रोल पंपांसाठी भाड्याने देण्यास इच्छुक नाहीत. त्यामुळे भारत पेट्रोलियमसारख्या कंपनीला इच्छा असूनही या भागात पेट्रोल पंप सुरू करता येत नाही.

> ३०० हून अधिक सोसायट्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बालेवाडी वेल्फेअर फेडरेशनने ही समस्या महापालिका आयुक्तांकडे मांडली आहे. भारत पेट्रोलियम कंपनीलाही या भागात आपले आउटलेट सुरू करण्याची इच्छा आहे. तसेच, या संदर्भात मंत्री चंद्रकांत पाटील यांनाही विनंती करण्यात आली आहे.
>
> -परशुराम तारे, सचिव, बालेवाडी वेल्फेअर फेडरेशन

> परिसरात पेट्रोल पंप उपलब्ध नसण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाढती जमीन किंमत. भूखंडांचे दर प्रचंड वाढल्याने जमीनमालक आपली जमीन पेट्रोल पंपांसाठी भाड्याने देण्यास इच्छुक नाहीत. त्यामुळे हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.
>
> -हेमंत कुलकर्णी, नागरिक, बालेवाडी

# इच्छुकांचे स्वप्नांवर फेरले पाणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकां पुन्हा पुढे ढकलल्या

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सातत्याने लांबत चालल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये निराशेचे वातावरण पसरले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सातत्याने लांबत चालल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये निराशेचे वातावरण पसरले आहे. खरे तर, दीर्घकाळ जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रतीक्षेत असलेल्या इच्छुकांनी आम्ही किती दिवस कार्यकर्ते सांभाळायचे? किती वर्षे भावी नगरसेवक, भावी जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य म्हणून मिरवायचे? असे सवाल केले जात आहेत. अर्थात, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे गेल्याने इच्छुकांची स्वप्न पुन्हा भंगले आहे.

आंबेगाव तालुक्याचे राजकीय चित्र पहाता, तालुक्यात पाच जिल्हा परिषद गट असून दहा, पंचायत समिती गण आहेत. सध्याची तालुक्याची राजकीय परिस्थिती पाहिली तर, काही महिन्यांपूर्वीच विधानसभा निवडणुकीत काठावर पास झालेले माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या दृष्टीने होणारी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक प्रतिष्ठेची आणि महत्त्वाची ठरणार आहे. कारण, गेली 35 वर्षे तालुक्याचे राजकारण वळसे पाटील यांच्या भोवती फिरत राहिले आहे. मात्र, यावेळच्या विधानसभा निवडणुकीत वळसे पाटील फार कमी मताधिक्याने विजयी झाले, त्यामुळे आगामी काळात होणारी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक असून निवडणुका वेगवेगळ्या कारणाने पुढे ढकलल्या जात आहेत. यापूर्वी, स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाल संपण्यापूर्वीच अनेक इच्छुकांनी पदाकरता मोर्चे बांधणी करून ठेवली आहे. मात्र, गेली दोन-तीन वर्षांपासून अनेक इच्छुकांचे विविध प्रकारचे कार्य सुरू असून इच्छुकांना लाखो रुपयांचा भुर्दंड सोसावा लागलेला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर व्हाव्यात अशीच इच्छुकांची अपेक्षा असल्याचे चित्र पाहायला मिळते.

यापूर्वी, लोकसभा आणि विधानसभा निवडणुका संपल्यानंतर लगेचच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे बोलले जात होते. विधानसभा निवडणुकीतील अनेक विजयी आणि पराभूत उमेदवारांनी स्थानिक स्वराज्य संस्थेवर आपली पकड ठेवण्याच्या उद्देशाने पावले उचलण्यात सुरुवात केली आहे.



### वळसे पाटलांकडून पुन्हा शह बसणार?

» आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे विधानसभेचे पराभूत उमेदवार देवदत्त निकम यांनी देखील तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात राहण्यासाठी मोर्चे बांधणी केली असून तालुकाभर विविध कार्यक्रमांना निकम हजेरी लावत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, त्यांच्या प्रयत्नांना वळसे पाटील कशाप्रकारे राजकीय शह देतात हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.

### अनेक विकासकामे ठप्प

» प्रदीर्घकाळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नसल्याने त्याचा विकासकामावर देखील परिणाम झाला असून जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सदस्य धोरणात्मक निर्णय घेऊ शकतात, तर प्रशासक हे निर्णय घेऊ शकत नसल्याने विकासाची अनेक कामे ठप्प झाली असल्याचे चित्र पाहायला मिळते.